# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

**क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ** आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे — ४११००७ (भारत)

**Board of Sports & Physical Education** Near. IUCAA, Ganeshkhind, Pune – 411007 (INDIA)

Telephone No. 02025622664, 66 e-mail: directorsports@unipune.ac.in


संदर्भ: विक्रीमं/शिबीर/५५७ दिनांक: ०३ जुलै, २०२६.

**प्रति,**
**मा. प्राचार्य/मा. संचालक,**
**संबंधित संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था,**

**विषय: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्थामधील शारीरिक शिक्षण संचालकांचे ३८ वे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर २०२६—२७ बाबत.**

महोदय/महोदया,

आपणांस या पत्राद्वारे कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मधील ३८ वे शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ व **बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे** या महाविद्यालयाच्या सौजन्याने **गुरूवार, दि. २३ जुलै, २०२६** ते **शनिवार, दि. २५ जुलै, २०२६** याकालावधीत **लाईफ ट्रान्सफॉरमेशन सेंटर, बोरीबेल, दौंड, जि. पुणे** येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या चर्चासत्रास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये **पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना उपस्थित राहणे** अनिवार्य राहणार आहे. या क्रीडा चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराबाबतची माहिती व सूचना आपल्या महाविद्यालयातील पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना निर्देशित करणे. ही विनंती.

**अ)** शारीरिक शिक्षण संचालक चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहण्याबद्दल संबंधित शारीरिक शिक्षण संचालकांचा दैनंदिन भत्ता, प्रवास खर्च व इतर अनुषांगिक खर्च हा संबंधित महाविद्यालयाने करावा.

**ब)** चर्चासत्र व क्रीडा शिबीर मार्गदर्शनाचा कालावधी एकुण तीन दिवसांचा असेल. प्रत्येक शिबीरार्थीस नोंदणी शुल्क रू. ७५०/—(रूपये सातशे पन्नास फक्त) प्रतिदिनी याप्रमाणे रू.२२५०/— (रूपये दोन हजार दोनशे पन्नास फक्त) व अनामत रक्कम म्हणून रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) एकूण रू. ३,२५०/— (रूपये तीन हजार दोनशे पन्नास फक्त) रक्कम सहभागी होणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांना **गुरूवार, दि. २३ जुलै, २०२६** रोजी नावनोंदणी करतेवेळी चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर आयोजन करणाऱ्या महाविद्यालयाकडे जमा करणे क्रमप्राप्त राहील. सदर रक्कमेची रीतसर पावती सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांना देण्यात येईल. **दि. २३ जुलै, २०२६** रोजी रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) अनामत रक्कमेची पावती सादर केल्यानंतर

रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) शारीरिक शिक्षण संचालकास परत करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. आयोजक व सहभागी शिबीरार्थींच्या सोयीकरिता अगाऊ नोंदणी व पैसे जमा करण्याकरिता ऑनलाईन लिंक व्हॉट्सअॅपद्वारे लवकरच कळविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

क) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित शारीरिक शिक्षण संचालकांकरिता निवास, नाष्टा, चहापान, भोजन व आवश्यक स्टेशनरी ची सोय आयोजकांमार्फत करण्यात येईल.

ड) **गुरूवार, दि.२३ जुलै, २०२६** रोजी चर्चासत्राच्या ठिकाणी ठीक **सकाळी ११.०० वाजेपर्यंत** सर्व शारीरिक शिक्षण संचालकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रत्येक सहभागी शिबीरार्थीजवळ नाव नोंदणी करताना संबंधित महाविद्यालय/संस्था यांचे **मा.प्राचार्य/ मा.संचालकांचे संमतीपत्र** (शिबीरास उपस्थित राहण्याबाबतचे) **सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा संबंधित शारीरिक शिक्षण संचालकास सहभागी होता येणार नाही. यांची कृपया नोंद घ्यावी. गुरूवार, दि. २३ जुलै, २०२६** रोजी दुपारी ठिक ०१.०० वा शिबीरार्थींना चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन व चर्चासत्र शिबीरातील कार्यक्रम इ.बाबत विशेष सूचना देण्यात येतील.
टीप : सर्व शारीरिक शिक्षण संचालक (पुरूष/महिला) यांनी एम. आय टी. चे लाईफ ट्रान्सफॉरमेशन सेंटर, बोरीबेल, दौंड, पुणे येथे वेळेवर उपस्थित राहावे. शिबीरस्थळी पोहोचण्याकरिता पुणे सोलापूर रोडवर कुरकुंभ व भिगवण दरम्यान रावणगाव येथून साधारण ५ कि.मी. अंतरावर आहे.

इ) **या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या कालावधीत कोणत्याही शारीरिक शिक्षण संचालकास खाजगी कामाकरीता अन्य ठिकाणी जाण्याची कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. गुरूवार, दि. २३ जुलै, २०२६ ते शनिवार, दि. २५ जुलै,** २०२६ या कालावधीत होणाऱ्या शिबीराच्या प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य असेल तद्नंतरच संबंधित शिबीरार्थीस शिबीरास उपस्थितीबाबतचे **प्रमाणपत्र व कार्यमुक्ती आदेश (Reliving Order)** देण्यात येईल.

ई) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर **उद्घाटन** व **समारोपदिनी** प्रत्येक शारीरिक शिक्षण संचालकांकडे पूर्ण पांढरा गणवेश (पोशाख) असणे आवश्यक आहे. नसल्यास किमान पांढरा शर्ट/टी—शर्ट आवश्यक राहील. महिला शारीरिक शिक्षण संचालकांना पांढरा पंजाबी ड्रेस आवश्यक राहील.

उ) या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरामध्ये **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण—२०२०, क्रीडा प्रशासन व व्यवस्थापन, विद्यापीठीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन, खेळाडू विकास, क्रीडा विज्ञान, शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषणशास्त्र, विद्यापीठाच्या क्रीडा विषयक धोरणे, विविध शासकीय योजना तसेच क्रीडा क्षेत्रातील अद्ययावत घडामोडींवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, परिसंवाद, चर्चासत्रे, प्रात्यक्षिके व संवादात्मक** सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत.

महत्त्वाच्या सूचना :

१. शिबीरार्थींनी शिबीरास येताना **मौल्यवान वस्तु अथवा अनावश्यक रोख रक्कम** ही स्वत:च्या जवाबदारीवर आणावी. तसेच लागणारे आवश्यक औषधे सोबत आणावी.

२. निवासाची व्यवस्था क्रीडा संचालकांना प्रत्येक शेअर रूममध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

३. **गुरूवार, दि. २३ जुलै, २०२६** रोजी सकाळी ठीक ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत **एम. आय टी. चे लाईफ ट्रान्सफॉरमेशन सेंटर, बोरीबेल, दौंड, जि. पुणे** येथे स्वागत व नोंदणीकक्ष येथे उपस्थित राहावे.

४. प्रत्येक सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांने **आपल्या महाविद्यालयांचे ओळखपत्र** सोबत आणावे.

५. **आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक सदर चर्चासत्र व क्रीडा मागदर्शन शिबीरास उपस्थित राहणार आहे किंवा नाही. याबाबत दि. १५ जुलै, २०२६ पर्यंत आयोजक महाविद्यालयास कळविण्यात यावे. ही विनंती.**

सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांच्या निदर्शनास आणुन या शिबीरातील, क्रीडा क्षेत्रातील आधुनिक बाबी अवलोकन करण्यासाठी आवश्यक उपस्थित राहण्यास सांगावे.

धन्यवाद! सहकार्याची अपेक्षा!

कळावे,

आपला,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा पुणे-४११००७

सहायक क्रीडा संचालक,
(अतिरिक्त कार्यभार)
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

प्रत माहितीसाठी:—
१) मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
२) मा. प्र—कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
३) मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
४) मा. सदस्य, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
५) मा. वित्त व लेखाधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
६) मा. प्राचार्य, बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे
७) मा. शा. शि. संचालक, बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे